रास्तभाव दुकानांमध्ये ठेवण्यात
येणाऱ्या अभिलेखाबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः राभादु-३९२६/प्र.क्र.२५९/नापु-३१
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : - ०९ ऑक्टोबर, २०२६.

वाचा- **शासन परिपत्रक, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक FPS-१०७४/१०१३१-XXII, दिनांक २४ ऑगस्ट १९७६.**

शासन परिपत्रक:-

वाचा येथील शासन परिपत्रकान्वये रास्त भाव दुकानदारांना विविध प्रकारच्या नोंदवह्या (Registers) विशिष्ट कालावधीसाठी जतन करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, सद्यःस्थितीत रास्त भाव दुकानांमध्ये सर्व प्रकारचे कामकाज ई-पॉस मशीन व ऑनलाईन पोर्टलव्दारे होत आहे. त्यामुळे दिनांक २४.०८.१९७६ च्या परिपत्रकानुसार विविध नोंदवह्यांमध्ये स्वतंत्र नोंदी करण्याची आवश्यकता राहिलेली नाही.

२. उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेता वाचा येथील दिनांक २४.०८.१९७६ चे शासन परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१००९१६४१३१९३०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIKAS
MOHAN RAUT

Digitally signed by VIKAS MOHAN RAUT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=2257bfd8267146a9a0f6fe86e455cfabd6b353b41a3dcde19df1c89749d0de4d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=65D403E0F9767CEEA21CB169A8A5475E77BE535DEEEF3CF5809A87BF3A020F2F, cn=VIKAS MOHAN RAUT
Date: 2026.10.09 16:42:29 +05'30'

(विकास राऊत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
३. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव.
४. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई ३२.
५. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी.
६. सर्व विभागीय आयुक्त
७. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, मुंबई.

८. सर्व जिल्हाधिकारी.

९. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.

१०.सर्व उपायुक्त (पुरवठा).

११.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.

१२.सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.

१३.अध्यक्ष, ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉपकिपर्स फेडरेशन, पुणे.

१४.अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ, पुणे.

१५.अध्यक्ष, मुंबई रेशन दुकानदार संघटना, मुंबई.

१६.निवड नस्ती (कार्यासन नापु. ३१)